विभागीय वन अधिकारी,गट-अ (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन आदेश क्र.एमएफएस-२०१९/प्र.क्र.३०/फ-८
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेबर, २०१९.

पहा :- शासन आदेश महसूल व वन विभाग क्र. शासन आदेश क्र.एमएफएस-२०१९/प्र.क्र.३०/फ-८ दि. २९ ऑगस्ट, २०१९.

शासन आदेश :-

शासन आदेश दि. २९ ऑगस्ट, २०१९ अन्वये वन विभागातील सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील १८ अधिकाऱ्यांची विभागीय वन अधिकारी, गट-अ (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गातील खुल्या प्रवर्गासाठी राखीव जागांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

२. सदरहू आदेशान्वये श्री.मधुकर बापुराव तेलंग (जे.क्र.२०१) यांना खुल्या प्रवर्गातून पदोन्नती देण्यात आली आहे. श्री.तेलंग यांना विभागातील विभागीय वन अधिकारी, गट-अ (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गात पदोन्नतीने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टीने खालीलप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

अ.क्र.	सहाय्यक वन संरक्षकांचे नाव	विभागीय वन अधिकारी संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना	शेरा
१	श्री.मधुकर बापुराव तेलंग	विभागीय वन अधिकारी, (प्रादे.) बीड	श्री.अमोल रा.सातपुते यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर

श्री.अमोल रा.सातपुते,विभागीय वन अधिकारी (प्रादे.) बीड यांच्या बदलीने पदस्थापनेचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहेत.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३११३३०३४३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Niwrutti Dhas

Digitally signed by Anil Niwrutti Dhas
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=699d21cc89897191099434d443603426329c81b1b292ed2d168c892811118cc7, serialNumber=f85f1c64c05886c8d514e40d54d27ff3a80ffd907a05433b1c412b7f7ffa0afd, cn=Anil Niwrutti Dhas
Date: 2019.09.13 11:45:53 +05'30'

(अनिल धस)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, म.रा., पुणे.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक /सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव)
८. सर्व वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण
९. सर्व उपवनसंरक्षक
१०.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.-१२), मंत्रालय, मुंबई-३२
११.महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र मुंबई/नागपूर
१२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३.मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
१४.मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
१५.प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१६.संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) , म.रा.नागपूर यांचे मार्फत.
१७.निवड नस्ती (फ-८ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२